सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
खुद्दच्या आस्थापनेवरील २४ अस्थायी पदांना
मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक :- आस्थाप्र-२०१५/प्र.क्र.२७/आस्था-१/भाग-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २४ सप्टेंबर, २०१९.

वाचा :- १) शासन निर्णय, सा.न्या.व वि.स.विभाग,क्र.आस्थाप्र-२०१५/प्र.क्र.२७/आस्था-१, दि.१६/०३/२०१६.
२) शासन निर्णय, सा.न्या.व वि.स.विभाग, समक्रमांक, दिनांक २४/१०/२०१७, दि.१८/०१/२०१८ व दि.१४/०३/२०१८, दि.१५/१०/२०१८ आणि दि.०३/०४/२०१९.
३) शासन निर्णय, सा.न्या.व वि.स.विभाग,क्र.आस्थाप्र-२०१६/प्र.क्र.३७५/आस्था-१, दि.२४/११/२०१६ तसेच शुध्दीपत्रक समक्रमांक दि.०२/१२/२०१६ व दि.१६/०२/२०१७
४) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/विसु-१, दि.१०/०२/२०१७
५) शासन निर्णय, सा.न्या.व वि.स.विभाग,क्र.आस्थाप्र-२०१७/प्र.क्र.१९७/आस्था-१, दि.०९/०६/२०१७.
६) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/आपुक,दि.०३/१०/२०१७
७) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क.दि.११/०९/२०१९

शासन निर्णय :

या विभागाच्या (खुद्द) मंत्रालयीन आस्थापनेकरीता १४६ पदे मंजूर असून त्यापैकी सोबतच्या विवरणपत्रात दर्शविलेली एकूण २७ पदे दिनांक ३१/१२/२०१७ पर्यंत चालू ठेवण्यास संदर्भ क्र.२ येथील दि.१५/१०/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे. तद्नंतर प्रशासकिय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार ८०% पदे म्हणजेच ११६ पदे कायम करण्यास उपरोक्त संदर्भ क्र.३ नुसार मान्यता देण्यात आली आहे.

२. तद्नंतर या विभागातून विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग हा नवीन विभाग निर्माण करण्यात आला. सदर विभागास संदर्भ क्र. ५ येथील दि.९/६/२०१७ च्या शासन निर्णयान्वये या विभागातील पदांमधील २९ पदे हस्तांतरीत करण्यात आली आहे. त्यामुळे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (खुद्द) मंत्रालयीन आस्थापनेकरीता एकूण ११७ पदे मंजूर असून त्यातील ६ अस्थायी पदे या विभागांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या राष्ट्रीय एकात्मता, विश्वबंधुत्व व विचार संवर्धन समितीच्या कामकाजासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. सदर अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील. आता उर्वरित १११ पैकी २४ अस्थायी पदांना शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क. दि.११.९.२०१९ मधील अटींच्या अधीन राहुन दि.२९.२.२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

३. यासंदर्भात होणारा खर्च “मागणी क्रमांक एन-२, २२५१-सेक्रेटरीएट, सामाजिक सेवा-०९०-सेक्रेटरीएट (०१) (०१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (२२५१ ०११ ३) (०१) वेतन, योजनेतर” या लेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात येऊन त्या खाली सन २०१९-२० या वर्षाकरीता मंजूर करण्यात येणाऱ्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. हे आदेश शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आपुक, दि. ११.९.२०१९ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०९२४११३०२७९८२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

SANJAY GIRIDHAR PATIL

Digitally signed by SANJAY GIRIDHAR PATIL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=0f7d1eee7567d430eefd928eefa78ed2a6072c4ce8f3c0aa4efaf26d9c32daeb, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=bd10fe5a55495bc381e7b4d4b658250c74eb3f55113a21fd21c8620f04c2c257, ou=SOCIAL JUSTICE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SANJAY GIRIDHAR PATIL
Date: 2019.09.24 11:31:46 +05'30'

(सं. गि. पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), मुंबई.
२) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४) वित्त विभाग (का.व्यय-१४), मंत्रालय, मुंबई.
५) अवर सचिव (का.रोखशाखा/अर्थसंकल्प), सा.न्या. व वि.स. विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६) निवडनस्ती (आस्था-१).

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय : आस्थाप्र-२०१५/प्र.क्र.२७/आस्था-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २४ सप्टेंबर, २०१९.

अ.क्र.	**पदनाम**	**वेतनश्रेणी (रुपये)**	**पदांची संख्या**	
			कायम	**हंगामी**
	गट-अ			
१	प्रधान सचिव/ सचिव	६७०००-७९०००(H.A.G.)	१	--
२	उप सचिव (भाप्रसे)	--	--	--
३	किंवा सह सचिव/	३७४००-६७०००(ग्रेड पे-८७००)	१	१
४	उप सचिव	१५६००-३९१००(ग्रेड पे-७६००)	--	१
५	अवर सचिव	१५६००-३९१००(ग्रेड पे-६६००)	२	३
६	सहायक संचालक	९३००-३४८००(ग्रेड पे-५४००)	१	--
		एकूण गट-अ पदे	**५**	**५**
	गट-ब			
१	कक्ष अधिकारी	९३००-३४८००(ग्रेड पे-४४००)	१२	१
२	वरिष्ठ स्वीय सहायक/	१५६००-३९१००(ग्रेड पे-६६००)	--	--
३	निवडश्रेणी लघुलेखक	९३००-३४८००(ग्रेड पे-४६००)	२	--
४	उच्चश्रेणी लघुलेखक	९३००-३४८००(ग्रेड पे-४४००)	३	१
५	सहायक कक्ष अधिकरी	९३००-३४८००(ग्रेड पे-४३००)	२८	१
६	निम्नश्रेणी लघुलेखक (मराठी)	९३००-३४८००(ग्रेड पे-४३००)	३	--
७	निम्नश्रेणी लघुलेखक (इंग्रजी)	९३००-३४८००(ग्रेड पे-४३००)	--	१
		एकूण गट-ब पदे	**४८**	**४**

	गट-क			
१	लघुटंकलेखक	५२००-२०२००(ग्रेड पे-२४००)	--	१
२	लिपिक-टंकलेखक	५२००-२०२००(ग्रेड पे-१९००)	२४	९
३	वाहन-चालक	५२००-२०२००(ग्रेड पे-१९००)	१	--
		एकूण गट-क पदे	**२५**	**१०**
	गट-ड			
१	हवालदार	४४००-७४४०(ग्रेड पे-१६००)	--	१
२	नाईक	४४००-७४४०(ग्रेड पे-१६००)	१	१
३	रोनिओ शिपाई	४४००-७४४०(ग्रेड पे-१६००)	--	१
४	झेरॉक्स मशीन चालक	४४००-७४४०(ग्रेड पे-१६००)	--	१
५	शिपाई	४४००-७४४०(ग्रेड पे-१३००)	८	१
		एकूण गट-ड पदे	**९**	**५**
		एकूण	**८७**	**२४**